| MHSN060000042025 | PWDVA Execution 2/2025<br>Sarita Balaso Yesumali Vs. Balaso Krishna Yesumali |
|---|---|

## निशाणी १४ वरील आदेश

अर्जदार हिने सदरचा अर्ज पोटगीची रक्कम जाबदार यांच्या पगारातून दरमहा कपात होऊन मा. कोर्टात जमा होणकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार हिच्या कथनानुसार, अर्जदार हिने थकित पोटगीची रक्कम वसुल होऊन मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज जाबदार यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. जाबदार यांचेकडून एकूण रक्कम रुपये २,०९,०००/- इतकी रक्कम येणेबाकी आहे. अर्जदार यांचे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तसेच त्यांची मुले ही शाळेस जातात. जाबदार हे वेळेवर पोटगीची रक्कम देत नाहीत. जाबदार हे महाराष्ट्र राज्य विज वितरण क. लि. मध्ये कायमपणे नोकरीस असून त्यांना सध्या रक्कम रुपये ९२,८७६/- इतका पगार आहे. सदरकामी पगार दाखलाही हजर केलेला आहे. सबब अर्जदार हिने सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. जाबदार यांनी सदर अर्जास त्याचे म्हणणे दाखल न केलेने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणे विना चालविणेत येत आहे.

४. जाबदार हा महाराष्ट्र राज्य विज वितरण क. लि. मध्ये कायमपणे नोकरीस असून त्यास दरमहा र.रु.९२,८७६/- इतका पगार मिळत असूनही त्याने अर्जदार यांची थकीत पोटगी रक्कम सुरळीतपणे दिली नसल्याचे दिसून येते. फौजदारी प्रक्रिया संहिता

मधील चापटर ९ मध्ये कलम १२५ ते १२८ अंतर्गत विहीत केलेल्या सर्व तरतूदी या पिडीत महिलांच्या कायदेशीर हक्कांच्या रक्षंणाकरीता व त्यांच्या फायदयाकरीता केलेल्या आहेत. जाबदार हा त्याची आर्थीक परिस्थीती असतानाही त्याने अर्जदार यांना मंजूर पोटगी देण्यास टाळाटाळ केली आहे. वर नमूद केलेल्या सर्व तरतुदी या Quasi civil quasi criminal अशा स्वरूपाच्या असल्याने पगार जप्ती संदर्भातील तरतूदींचा अवलंब करताना दि.प्र.सं. कलम ६० मध्ये दिलेल्या तरतूदीचा विचार करणे याठिकाणी योग्य होईल. दि.प्र.सं. कलम ६० सब कलम (ia) नुसार पोटगी वसूलीचा आदेश असेल तर त्या आदेशाची अंमलबजावणी करताना पगार रकमेपैकी १/३ रक्कम जप्त करून ती व्यथीत महिलेला देणेबाबतची तरतूद नमूद आहे. याप्रमाणे विचार केल्यास जाबदार यास मिळणारी एकूण पगार रक्कम रु.९२,८७६/- यापैकी रक्कम रुपये ४२,३५७/- इतकी कपात होऊन रक्कम रुपये ५०,५१९/- इतका पगार जुन २०२५ या कालावधीमध्ये जाबदार यास अदा झाल्याचे दिसून येते. अर्जात नमूद केलेप्रमाणे अर्जदारची मुले शाळेत जात असून त्यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार व मुलांच्या पालनपोषनाकरीता व शिक्षणाकरीता थकीत रकमेची आवश्यकता असल्याचे दिसते. तसेच थकीत रक्कम ही जवळपास २,०९,०००/- इतकी आहे. त्यामुळे जाबदार यास मिळणा-या पगारापैकी र.रु.२०,०००/- अकरा महिन्याच्या कालावधीकरीता जप्त केल्यास अर्जदार हिची थकीत पोटगी रक्कम पूर्णपणे वसूल होईल. जाबदार यांनी याकामी हजर राहून पोटगी रक्कम देणेबाबत कसलेही स्पष्टीकरण दिले नसल्याने ते भविष्यात अर्जदार यांची पोटगी रक्कम सुरळीतपणे व विनातक्रार देतील असे सदय स्थितीत दिसत नाही. अशाप्रकारे अर्जदार व तिच्या मुलांचा शिक्षणाचा व पालनपोषणाचा, जाबदार यास मिळणा-या पगाराचा व जाबदार याची थकीत पोटगी न देणेबाबतच्या वृत्तीचा एकत्रीतपणे विचार करून माहे ऑक्टोबर-२०२५ ते माहे ऑगस्ट-२०२६ पर्यत जाबदार याच्या दरमहा मिळणा-या पगारातून र.रु.२०,०००/- प्रमाणे कपात होणेबाबत व माहे सप्टेंबर-२०२६ या महिन्यात र.रु.९,०००/- कपात करणेबाबतचा आदेश देणे न्यायोचित होईल असे वाटते. सबब,

खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.लि., विजबोर्ड, विश्रामबाग, सांगली यांनी त्यांचेकडे करोली टी येथे कार्यरत असलेले बाळासो कृष्णा येसूमाळी यांचे पगारामधून माहे ऑक्टोबर–२०२५ ते माहे ऑगस्ट–२०२६ पर्यत दरमहा पगारातून र.रु.२०,०००/– प्रमाणे व माहे सप्टेंबर–२०२६ या महिन्यात र.रु.९,०००/– कपात करुन ती रक्कम या न्यायालयाकडे याकामी थकीत पोटगीपोटी जमा करावी असा आदेश त्यांना देणेत येतो.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी माहे ऑक्टोबर–२०२५ च्या पगारापासून करणेची आहे याची नोंद संबंधित कार्यालयाने घेणेची आहे.

४. सदर आदेशाची प्रत संबंधित महावितरण कंपनीस न्यायालयामार्फत पाठविणेत यावी.

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.09.04 11:20:44 +0530

मिरज. (अनिरुध्द एस. राणे)
दि. ०३.०९.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Shri. S. S. Shingana |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 03.09.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 04.09.2025 |